Volume - 4 | Issue - 12 | june - 2017

# RESEARCH DIRECTION

UGC APPROVED


International Recognition Interdisciplinary Research Journal

Impact Factor 2.9005(UIF)

ISSN 2321-5488

Not found

# चरित्र वाङ्मयाचा इतिहास





प्रा. घोडके बापूसाहेब गोरख

घोडके बापूसाहेब गोरख

सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

सारांश :– जगातील बहुतेक संस्कृतीमध्ये नैतिक दृष्टिकोनातून किंवा आदर्शकरणच्या प्ररणेतून लिहिलेल्या आठवणी, ऐतिहासिक बखरी आणि व्यक्तिचित्रिणात्मक छोटेखानी चरित्रे यांच्यापासून चरित्रलेखनाला प्रारंभ झाला आहे.

Editor - In - Chief - S.P. Rajguru




ISSN NO:- 2321-5488 Impact Factor : 2.9005(UIF) Vol.- 4, Issue - 12, June -2017





| Sr. No | Title And Name Of The Author (S) | Page No |
|---|---|---|
| 1 | Human Rights And Ngos: North Karnataka Perspective<br>Mr. Mallesh Doddalakkannavar and Dr. Kamalaxi G. Tadasad | 1 |
| 2 | Muslim Community : A Factual Study<br>Prof. Bansode S. S. | 5 |
| 3 | The Impact Of Fdi On Domestic Investment In India, An Analysis Of Crowd In Crowd Out Effect<br>Nitu Kumari | 9 |
| 4 | Autism Spectrum Disorders: Etiology, Diagnosis, And Intervention<br>Nigesh K. and Saranya T. S. | 15 |
| 5 | Malnutrition In India: Concept, Causes And Influential Factors<br>Anita | 26 |
| 6 | Central Asian Republics: Geopolitical Determinants<br>Shweta Kumari | 34 |
| 7 | Assessment Of The Market Potential Of Business To Business E-Commerce (A Study Conducted in Indian Footwear Industry, Calicut, Kerala)<br>Fazeen Rasheed A. K. and Dr. Rupa Gunaseelan | 40 |

| | | |
|---|---|---|
| 8 | Importance Of English Language In Education For Knowledge Building Society<br>Dr. Smita R. Deshmukh | 47 |
| 9 | Disaster Management: Issues,Preparation And Remedies<br>Sumit Khanna and Dr. Alka Singh | 52 |
| 10 | Science And Religion<br>Dr. Sunita Tewari | 59 |
| 11 | Effect Of Vision Training On Serving Skill Of Volley Ball Players<br>Dr. Xavier Maria Raj | 61 |
| 12 | मध्य प्रदेश राज्य शिक्षा केनद्र द्वारा अनुशंसित कक्षा 9वीं की विज्ञान विषय की पाठ्य पुस्तक का विद्यार्थियों की प्रतिक्रियाओं के आधार पर मूल्यांकन<br>नीलम वर्मा , हंसराज पाल | 64 |
| 13 | Mapping Women's Access To Agricultural Land Across Social Groups: A District Level Analysis Of Rural West Bengal<br>Padmaja Mondal, Bailochan Behera, Dhirendra Kumar Tyagee and Ranjan Karmakar | 71 |
| 14 | Effect Of Yogic Practices On Selected Physiological Variable Among The High School Obese Girls<br>Santhosh Kuriakose K. and Dr. George Abraham | 80 |
| 15 | चरित्रवाङ्मयाचा इतिहास<br>प्रा. घोडके बापूसाहेब गोरख | 83 |

ISSN: 2321-5488 IMPACT FACTOR : 2.9005 (UIF)

Research Directions

RESEARCH DIRECTIONS

VOLUME - 4 | ISSUE - 12 | JUNE - 2017

# चरित्रवाङ्मयाचा इतिहास



**प्रा. घोडके बापूसाहेब गोरख**
**सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.**

**प्रास्ताविक -**

जगातील बहुतेक संस्कृतीमध्ये नैतिक दृष्टिकोनातूनकिंवा आदर्शकरणच्या प्रणेतून लिहिलेल्या आठवणी, ऐतिहासिक बखरी आणि व्यक्तिचत्रिणात्मक छोटेखानीचरित्रे यांच्यापासून चरित्रलेखनाला प्रारंभ झाला आहे. जगातीलवेगवेगळ्या धर्मसंस्थापकाबद्दलच्या त्यांच्या शिष्यानी लिहिलेल्या आठवणी चरित्रात्मक स्वरुपाच्या आहेत.

**जागतिक चरित्रवाङ्मयाचा इतिहास -**

पाश्चिमात्य जगामध्ये एक वाङमयप्रकार म्हणून चरित्रलेखनाला प्रारंभ प्लूटार्क पासून म्हणजेइ.स.सु. 46-इ.स.सु.120 मध्ये झाला असे मानले जाते.त्या काळात प्रतिष्ठित ग्रीकव रोमन व्यक्तीच्या चरित्रांचा तौलानिक अभ्यास करुननिष्कर्ष काढण्यावर अभ्यासकांचा भर होता. या दृष्टीने 'लाइव्हज ऑफ नोबलग्रीशन्स अॅड रोमान्स' हाचरित्रसंग्रह महत्त्वाचा व उल्लेखनीय आहे. त्याच समकालीन गेयस स्विटोनियस ट्रॅक्किलस यांच्या लेखनातचरित्रलेखनाला आवश्यक असे मानवी स्वभावविषयक निखळ कुतूहल आढळते.त्यांनी लिहिलेल्या 'द लाइव्हज ऑफ टवेल्व्हसीझर्स' हाग्रंथ व्यक्तिचित्रणात्मक चरित्राचे उत्कृष्ट नमुना आहे.

दहाव्या शतकानंतर इस्लामी संस्कृतीतलिहिलेलीसंतांची आणिविद्वानांचीचरित्रे महत्त्वाची आहेत. प्रबोधनकाळात व्हाझारिनेलिहिलेली 'द लाइव्हज ऑफ मोस्ट एमिनेट इटालियन पेंटर्स' (1511-74) या ग्रंथातीलचरित्रे महत्त्वाची आहेत. आठराव्या शतकात डॉ. जॉन्सननेलिहिलेले 'द लाइव्हज ऑफ द इंग्लिश पोएटस' (1579-81) वलिटन स्ट्रेची 'एमिनेट व्हिक्टोरियन्स' (1981) या चरित्र लेखनामागे प्रामुख्याने व्यक्तिचित्रणाची प्रेरणा होती.व्यक्तिगत भावसंबंधाचा आधार असलेलीचरित्रे उत्कृष्ट असतात असा अनुभव सर्वचचरित्र वाङ्मयातून निदर्शनास येतो. त्यामध्ये विल्यम रोपरचे 'लाईफ ऑफ सॅम्युएल जॉन्सन' (1991) आर्नेस्ट जोन्सचे 'द लाइफ अॅड वर्क ऑफ सिग्मंड फ्राइड' (1953-57) ही काही या काळातील दर्जेदारव उल्लेखनीय चरित्रे आहेत. त्यामध्ये बॉस्वेलवलॉकहार्ट यांनी लिहिलेलीचरित्रे जागतिकचरित्र वाङ्मयातील अक्षर वाङ्मय मानले जाते. टिपणे, विश्लेषण व संश्लेषण याचा सुरेख संगम साधल्यामुळे बॉस्वेलच्या चरित्रातूनगतीव जिवंतपणाचा प्रत्यय वाचकाला येतो तर आत्मजाणिवेचा अभाव व नाट्यत्माकता हीलॉकहार्टची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. निष्कर्ष काढण्याचा मोह टाळून जास्तीत-जास्त माहिती देण्याचा काही चरित्रकारांचा कटाक्षअसतो, तर ब्रिटिश चरित्रलेखनाचा विशेष म्हणजे प्रमाणभूत चरित्रांचे लेखन होय. प्रमाणभूत चरित्रामध्ये व्यक्तिगत आणि वस्तुगत सत्यामध्ये समतोल साधण्यांचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून येते.जागतिकचरित्र लेखनामध्ये मूल्यमापनात्मक चरित्रेहा एक प्रमुख प्रवाह आहे. अनेक चरित्रकार चरित्रविषयाच्या जीवनातून स्वत:ला जाणवलेले भावसत्य चरित्राच्या माध्यमातून व्यक्त करीत असतात. पुराव्याची पर्वा न करता कल्पनेचा आश्रय घेतला की चरित्राचे रुपांतर चरित्रात्मक कादंबरीत होते. दुय्यम सामग्रीवर भर, संशोधन, निवड हीचरित्र वाङ्मयाची प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात.

थोडक्यात जगातील सर्व संस्कृतीमध्ये कमी-जास्त प्रमाणात चरित्रलेखन झाल्याचे दिसून येते.त्या-त्या काळातील प्रचलित साहित्याच्या मानंदडामध्ये राहून चरित्र वाङ्मय प्रवांह विकसित होत आहे. मानव व मानवाचे व्यक्तिमत्त्व, कार्य, कर्तृत्व, तत्वज्ञान जगांसमोर मांडणेव समाजाला प्रेरणा देऊन योग्य दिशा देणे हे चरित्रवाङ्मयाचे प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येते.

**मराठीतील चरित्रवाङ्मय :-**

चरित्र लेखन हा एक प्राचीन व महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे.मराठी साहित्याला चरित्रात्मक लेखनाची दीर्घ परंपरा आहे.भारतीय जीवनसृष्टी ऐहिक नाही.तिच्यावर धर्मिकतेचा व पौराणिकतेचा मोठा पगडा आहे. मानवी कर्तृत्वापेक्षा दैवी चमत्कारावर अधिक विश्वस आहे.संस्कृतमध्ये ऐतिहासिक

दृष्टीकोनातून चरित्रलेखनाची परंपरा नाही.परंतु हर्षचरित, रजतरंगिणी, महावंश या सारखेग्रंथ उपवादात्मक स्वरुपातच चरित्रात्मक आहेत. परंतु मराठी साहित्यात चरित्र यामङ्याची परंपरा सुरुवातीपासून कमी-जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते.

### प्राचीन चरित्रलेखनाचेस्वरुप :-

मराठीत चरित्रलेखनाची सुरुवात 12 व्या शतकात उदयाला आलेल्या महानुभव संप्रदयापासून होते. या काळात म्हइंमभट्टाने चक्रधरव गोविंदप्रभू या पंथसंस्थापकाच्या 'लीळा'किंवा'आठवणी'अनुक्रमे 'लीळाचरित्र'व'गोविंदप्रभूचरित्र' या ग्रंथातसंग्रहीत केल्या आहेत. या ग्रंथामधून पंथप्रमुखाच्या लौकिक आणि अलैकिक व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ दर्शनघडते. त्याचप्रमाणे नागदेवाचार्य स्मृती सांगणाऱ्या'स्मृतिस्थळ'हा चरित्रात्मक ग्रंथ नरेंद्रव परशुराम यांचा आहे. भक्ती व पंथनिष्ठा हा महानुभवीय चरित्रमार्गाचा व तत्कालीन जीवन मूल्यांचा प्रसार व प्रचार करण्यांचे माध्यम म्हणून चरित्रात्मक लेखनाकडे पाहिले जातहोते.हीचरित्रे गद्य व पद्य स्वरुपात आहेत.

मराठी संत साहित्यातही मोठ्याप्रमाणात चरित्रात्मक लेखन झाले आहे.संतज्ञानदेव, संत रामदास यांच्यासंबंधी चरित्रपर लेखन मोठ्या प्रमाणावर झालेले आहे.संत नामदेवानी 'आदी','समाधी'व'तीर्थावळी'ही अभंगात्मक चरित्रलिहिली आहेत. तरसंत रामदास, संत जनाबाई, संत बहिणाबाई यांची ही गद्यपद्य मिश्रित चरित्रेलिहिली आहेत. संत महिपतीनी संताची महिती सांगण्यांसाठी मोठ्या प्रमाणात चरित्रलेखन केले आहे. अशाच प्रकारे बखरीमधून ही शिवकालीनव पेशवेकालीन अनेक महत्वाच्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. त्या काळातील बखरीत एका अर्थाने चरित्रगुण अधिक आढळतात. प्रचलित अर्थाने चरित्रवाङ्मय संकल्पनेकडे पूर्णतया झुकत नसली तरी एकंदरीत चरित्र नायकांच्या कार्यकर्तृत्वाचे दर्शन घडविण्याकडे विशेषकल दिसून येतो.

मराठी भाषेतील बरेच साहित्यप्रकार इंग्रजी वाङ्मयाशी परिचय झाल्यानंतर सुरु असले तरी चरित्राबाबातही गोष्ट तितकी शीखरी नाही हे महानुभव साहित्य, संतचरित्रव बखरीवरुनसिध्द होण्यासारखे आहे.चरित्र वाङ्मयाला मराठी साहित्यात प्राचीन व दीर्घ परंपरा आहेहे मान्य करावे लागते.परंतु इंग्रज पूर्वकालीन चरित्रविषय काहीसे अलौकिक असेहोते.अव्वल इंग्रजीकाळापासून तेलौकिक स्वरुपाचे झाले असे दिसून येते, यातून हेच स्पष्ट हेते की मध्ययुगीन काळापासून मराठीत चरित्र वाङ्मयाची परंपरा आहेव यात पंथानुसार वेगळेपण जाणवते.

### आधुनिक कालखंडातील चरित्रलेखन:-

आधुनिक काळात पाश्चिमात्य साहित्यांच्या संपर्कामुळे आणि प्रभावामुळे साहित्याकडे पहाण्याचा नवीन दृष्टिकोन साकार होऊ लागला.चरित्र हा स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे याची जाणीव निर्माण होऊ लागली. राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय एकात्मकता, गत वैभवशाली इतिहासाचे कुतूहल, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक विचारप्रवाह, विविध व्यक्तीचे जीवन आणि त्यांचे कार्य, कर्तृत्व, विचार इ.प्रेरणा या काळातील चरित्र लेखना मागे दिसून येतात. आठवणी, दैनंदिनी, पत्रव्यवहार, मुलाखती इ. उपयुक्त लेखनाचा चरित्रात्मक लेखनांचे साधन म्हणून उपयोग केला जाऊ लागला.चरित्रकारांनी आपला हेतू आणि उद्दिष्टयानुसार चरित्र विषय झालेल्या व्यक्तीच्या जीवनातीलघटना, प्रसंगाचीनिवड करुन तिच्या कार्यकर्तृत्वाचाशोधघेऊन चरित्रलेखन केले आहे.वस्तुनिष्ठते बरोबर आत्मपरतेचा स्पर्श चरित्रलेखनाला होऊ लागला होता. त्याच बरोबर सामाजिक स्थिती बरोबर समाजमन कसे बदलत गेले आणि त्यांचा मराठी चरित्रवाङ्मयावर कसा परिणाम झाला हेही अभ्यासवायाचे आहे.

प्राचीन काळातील मराठी चरित्र वाङ्मय पाहता वइंग्रजी वाङ्मयाचा संपर्क आल्यानंतरची अर्वाचीन काळातील मराठी चरित्र वाङ्मय यांच्यामध्ये उद्दिष्टे आणि वैशिष्ट्यमध्ये मोठ्या प्रमाणात भिंन्नता आहे.एक वाङ्मय प्रकार म्हणून मराठी चरित्रात्मक लेखनाची आधुनिक काळात जीविविध रुप वैशिष्ट्ये आढळतात त्या संदर्भात विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे 'डॉ.जॉन्सन' यांचे चरित्र, काशीबाई कानेटकराचे 'डॉ. आनंदीबाई जोशीचरित्र', कृष्णशास्त्री चिपळूनकरांचे 'सॉक्रेटिसचरित्र', वि.प. रानडे यांनी 'जॉर्जवॉशिंग्टन चरित्र', अवंतिकाबाईगोखले यांचे 'महात्मा गांधीचरित्र', न. चि.केळकरांचे त्रिखंडात्मक 'महात्मा गांधीचरित्र', न. चि.केळकरांचे त्रिखंडात्मक 'टिळकचरित्र', ग. द. खानोलकरांचे' माधव ज्युलियन', ग.ग.जांभेकरकृत 'बाळशास्त्री जांभेकर चरित्र', द.न. गोखले यांचे 'डॉ.केतकरचरित्र' यासारख्या चरित्रग्रंथाचा उल्लेख करतायेईल. यामुळे चरित्रनायक हा कुणी श्रीमंत, शूर, पराक्रमी, व्यक्तीच असावीही पूर्व संकल्पनाच संपूर्णपणे बदलून गेली. सर्वसामान्य व्यक्ती हीसुध्दा चरित्राचा नायक होऊ लागली. याच काळात थोर व्यक्तीचे आदर्श समाजापुढे ठेवण्याच्या हेतूने चरित्र लेखन मोठ्या प्रमाणात झाले. त्याच बरोबर, समाज उपयोगी व शालोपयोगी चरित्रांची भाषातरेही झाली आहेत.

### स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील चरित्रलेखन :-

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक समाजसुधारक, क्रांतीकारक, राजकीय नेते यांची चरित्रे या काळात लिहिली गेली.महात्मागांधी, लोकमान्य टिळक, न. चि.केळकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार पटेलही त्या काळातीललक्षात राहण्याजोगी नावे आहेत. या व्यक्तीचा समाजावर मोठा प्रभाव होता.त्यांचे विचार, कार्य कर्तृत्व समाजाला समजावे म्हणून मोठ्या प्रमाणात चरित्रलेखन झाले आहे.इंग्रजी साहित्याच्या संपर्कामुळे गुणात्मक चरित्रवाङ्मयाचे निकष अनेक चरित्रकारांनी पाळून चरित्रलेखन या काळात मोठ्या प्रमाणात केलेआहे. चरित्रनायकाच्या मूल्यमापनात व व्यक्तिविश्लेषणात अधिक स्पष्टता या काळात दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महत्त्वाचे समाजसुधारक व महत्त्वाच्या व्यक्तीची चरित्रेलिहिली आहेत. समाजकारणातील महत्त्वाच्या व्यक्तीची चरित्रेलिहून त्यांचे कार्य, कर्तृत्वविचार समाजासमोर मांडले पाहिजेत अशा प्रकारची जाणीव 1960 नंतर निर्माण झालेली दिसून येते. डॉ.भालचंद्र फडके, मोहन पाटील, भास्कर भोळे, प्रा.नलिनी पंडित, धनंजय कीर, गंगाधरगाडगीळ, य.दि.फडके, द.न. गोखले. इ. चरित्रकारांचा उल्लेख या संदर्भात करता येईल. विशेषत: समाजकार्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या म. फुले, संतगाडगे महाराज, पंजाबराव देशमुख, डॉ.बाबासाहेब

VOLUME 4 | ISSUE 12 |

आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, बाबा आमटे, नरेंद्र दाभोळकर यांची परिचयात्मक व गौरवात्मक [illegible] मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र त्याच बरोबर या समाजसुधारकांची परिश्रमपूर्वक व विश्लेषणात्मक चरित्रे मोठ्या प्रमाणात लिहिली गेली नाहीत. महाराष्ट्राला समाजसुधारकांचा मोठा वारसा आहे. त्यांचे विचारव कार्यमूलगामी, समाजाला मार्गदर्शन व प्रेरणादायी ठरणारे आहे अशा समाजसुधाकरांच्या विचारावर व कार्यावर प्रकाश टाकण्याचे कार्य अनेक चरित्रकरांनी केले आहे.

## निष्कर्ष-

1. पाश्चिमात्य जगामध्ये एक वाङमय प्रकार म्हणून चरित्रलेखनाला प्रारंभ प्लूटार्क पासून म्हणजे इ.स.पु. 46 इ.स.पु.120 मध्ये झाला असे मानले जाते.
2. चरित्रलेखन हा एक प्राचीन व महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे.मराठी साहित्याला चरित्रात्मक लेखनाची दीर्घ परंपरा आहे.
3. मराठीत चरित्रलेखनाची सुरुवात 12 व्या शतकात उदयाला आलेल्या महानुभव सांप्रदयापासून होते.
4. आधुनिक काळात पाश्चिमात्य साहित्यांच्या संपर्कामुळे आणि प्रभावामुळे साहित्याकडे पहाण्याचा नवीन दृष्टिकोन साकार होऊ लागला.
5. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक समाजसुधारक, क्रांतीकारक, राजकीय नेते यांची चरित्रे या काळात लिहिली गेली.

## संदर्भ ग्रंथ:-

1.कऱ्हाडे स.दा.-'चरित्रआणि आत्मचरित्र', लोकवाङ्मय ग्रह प्रकाशन प्रथमआवृत्ती, जुलै 1976
2.'मराठी विश्वकोषखंड' - 05 प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई प्रथम प्रकाशन.- 1976
3.कऱ्हाडे स.दा -'चरित्र आणि आत्मचरित्र', साहित्यरूप
4. जोशी आ. म.-'चरित्र आाणि आत्मचरित्र',
5. बोरगावकरव. दा.-'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे,
6. जोशी अ. म. -'चरित्र आत्मचरित्र',
7. बोरगावकरव. दा. - 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन',
8. देसाईव लिमये -'चरित्र आणि आत्मचरित्रे', फडके बुकसेलर्स, कोल्हापूर प्रथम, आवृत्ती, 1976,
9. संत जान्ववी -'चरित्र आत्मचरित्र - एक वाङ्मय प्रकार',